# प्रेसनोट

दि.१६/०५/२०२२

## लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस फौजदार व खाजगी इसमावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. ८१/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, ७अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३९ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक -<br>१) प्रविण बाळासाहेब मोरे, वय - ५० वर्षे, पद - पोलीस निरीक्षक, नेमणूक - लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण<br>२) कुतुबुद्दीन गुलाब खान, वय - ५२ वर्षे, पद - सहायक पोलीस फौजदार (ASI), नेमणूक - लोणावळा पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण<br>३) यासीन कासम शेख, वय - ५८ वर्षे, खाजगी इसम<br>(क्रं.२ व क्रं.३ याना अटक करण्यात आली आहे) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- ( दोन लाख रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,५०,०००/- (दीड लाख रूपये) |

पडताळणी दिनांक :- १२/०५/२०२२, १३/०५/२०२२
सापळा दिनांक :- १३/०५/२०२२.
ठिकाण :- करिष्मा ढाबा, पुणे मुंबई हायवे रोड, लोणावळा.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदारांच्या गॅस एजन्सीवर कारवाई न करण्यासाठी २ लाख रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदारांच्या गॅस एजन्सीवर कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक (ASI) कुतुबुद्दीन गुलाब खान यानी तक्रारदार यांचेकडे दोन लाख रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती दीड लाख रूपये लाच रक्कम खाजगी इसम यासीन कासम शेख याचेकरवी स्वीकारली. आरोपी लोकसेवक पोलीस निरीक्षक प्रविण बाळासाहेब मोरे यानी लाच मागणीस प्रोत्साहन दिले म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपी लोकसेवक क्र.०२ व क्र.०३ यांना अटक करून मा. विशेष न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांची दि.१८/०५/२०२२ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.